४०

# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित.


**:: प्रधान कार्यालय ::**

" मुंबै बँक भवन", २०७, डॉ.दादाभाई नौरोजी रोड,

फोर्ट , मुंबई ४०० ००१,    दूरध्वनी – २२६१७१ ५४ ते ५९


# अल्प मुदत शैक्षणिक कर्ज धोरण

Z:\Vaishu\Karj Dhoran 2026\Date 01.01.2026\Individual\Covering.Doc

# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित

## अल्प मुदत शैक्षणिक कर्ज धोरण

## दिनांक ०१/०१/२०२६ पर्यंत अद्यावत बदलासह कर्ज धोरण

**संचालक मंडळ सभा ४१/१६ दिनांक ३०/०१/२०१६ चे ठराव क्रमांक १९ नुसार**

**१) कर्ज मर्यादा –** रु.१,००,०००/-

**२) कोर्सेस पात्रता –** सरकारमान्य इन्स्टिट्युटमधून होम अप्लायन्स दुरुस्ती, टर्नर, फीटर, इलेक्ट्रीशियन अॅक्वा गार्ड सव्हसींग, सी.सी.टी.व्ही. सव्हसींग, कॉम्प्युटर हार्डवेअर, सॉफ्टवेअर ट्रेनिंग इत्यादी सारखे सर्व प्रकारचे तात्रिक शिक्षणासंबंधी कोर्स करणारे सज्ञान विद्यार्थी सदर कर्जास पात्र रहातील. विद्यार्थी भारतील नागरीक असणे आवश्यक असुन विद्यार्थ्यां सोबत आई / वडील / भाऊ, बहीण, तर विवाहीत विद्यार्थ्यास आवश्यकतेनुसार पती / पत्नी / आई / वडील / सासू / सासरे यापैकी एकास सह अर्जदार म्हणून घेणे आवश्यक राहील.

**३) व्याजदर –** नियमित वैयक्तिक शैक्षणिक कर्जाचे व्याजदरापेक्षा १/२% जादा

**४) परतफेड कालावधी** – १२ महिने (परतफेडीसाठी मोरॅटोरीयम कालावधी उपलब्ध होणार नाही.)

५) सदर कर्जास एक सह अर्जदार तसेच १ सक्षम जामिनदार घेणे आवश्यक राहील.

**६) कर्जास कव्हर बाबी –** i) तांत्रिक कोर्ससाठीची फी.

**७) आवश्यक कागदपत्रे –**
१) कर्जदार, सहअर्जदार व जामिनदारांची के.वाय.सी. कागदपत्रे उत्पन्नासंबंधी पूरावे, फोटो, ६ महिन्याचे बँक स्टेटमेंन्ट (सहअर्जदाराचे)
२) तंत्रशिक्षण देणा–या संस्था इन्स्टिट्युटचा संपूर्ण माहिती शैक्षणिक फी संबंधी माहिती प्रवेश निश्चिती पत्र, फी भरणेसंबंधी संस्थेचे पत्र.
३) विद्यार्थ्याचे मासिक स्टायपेंन्ट (विद्यावेतन) बँकेतील कर्जदाराचे बचत खात्यात जमा करणेसंबंधी इन्स्टिट्युटचे हमीपत्र.

**८) प्रोसेसिंग फी –** निरंक

**९) मार्जिन –** २५%

उपरोक्त कर्जाची उर्वरीत उचल प्रक्रीया, उचलीची कागदपत्रे व इत्यादी संपुर्ण प्रक्रीया बँकेच्या प्रचलीत वैयक्तिक शैक्षणिक कर्ज धोरणानुसार राहिल.

**अटी / शर्ती :-**

१) सदरचे कर्ज, सरकार मान्यता प्राप्त व्यवसायीक कोर्स पुर्ण करणेकरीता दिले जाईल.

२) अर्जदार, सहअर्जदार व जामिनदार उपनगरी रेल्वे गाड्याची प्रवासी वहातुक उपलब्ध असलेल्या परिसरात उदा – पश्चिम रेल्वे डहाणू पर्यंत, मध्य रेल्वे कर्जत / कसारा पर्यंत तर हार्बर रेल्वे पनवेल पर्यंत) वास्तव्यास असणे आवश्यक राहील.

३) कर्जदार, सहअर्जदार व जामिनदार यांना बँकेचे नाममात्र सभासदत्व घेणे आवश्यक राहील.

४) कर्जाची रक्कम कर्जदाराचे बचत खात्यात जमा करुन मागणीनुसार उचल देण्यात येईल.

(२८)



५) सदर कर्जावर व्याजदर बँकेच्य नियमित शैक्षणिक कर्जापेक्षा १/२% जास्त राहील.

६) कर्जावरील व्याजदरामध्ये वेळोवेळी होणारे बदल कर्जदारावर बंधनकारक राहील.

७) दरमहा कर्जहप्ता (मुद्दल + व्याज) दरमहाचे १५ तारखेपर्यंत भरणा करणे आवश्यक राहील अन्यथा बँकेच्या नियमानुसार लेट पेमेन्ट चार्जेस हफ्त्याचे रकमेनुसार वसुल केले जातील.

८) उपरोक्त अटीमध्ये पुर्व सुचने विना बदल करण्याचा तसेच जादा अटी अंतर्भूत करण्याचा अधिकार बँकेस राहील व तो कर्जदारास बंधनकारक राहील.